# खासदार प्रणिती शिंदे यांचे आश्वासक नेतृत्व; पंढरपूर-मंगळवेढावासियांनी दिला विजयाचा कौल

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

**सोलापूर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे ह्या विजयी ठरल्या असून या मतदारसंघातील तळागाळातील शेवटच्या मतदारांपर्यंत पोहोचून आपली भूमिका स्पष्ट करत मी तुमची लेक सोलापूरची लेक तुमच्या प्रश्नासाठी संसदेत आवाज उठवणार, तुमच्या सुखदु:खात सोबत राहणार ही भावनिक साद घलत भूमिका मांडल्यानेच मतदारांकडून मतांचं दान मिळाले अन् विजय खेचून आणला.**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीपासूनच महाविकास आघाडी गटबंधनातून काँग्रेसकडून प्रणिती शिंदे यांना उमेदवारी मिळणार हे निश्चित मानले जात होते. प्रणिती शिंदे यांनीही वेळ साधत विधानसभेत मंगळवेढ्याच्या २४ गावांच्या पाणीपुरवठ्याबाबत आवाज उठवला होता. तोच मुद्दा धरून त्यांनी मंगळवेढा तालुक्यातील २४ गावच्या पाणी प्रश्ना संदर्भात आपण आवाज उठवून आपली भूमिका कशा पद्धतीने मांडायची याबाबत दौरा सुरू केला. सुरुवातीला मराठा आंदोलनाचा फटका त्यांना पाटकुल या गावांमध्ये बसला. त्या ठिकाणी गावातून परत पाठवण्यासाठी कार्यकर्ते एकवटले असतानाच धाडस दाखवून प्रणिती शिंदे यांनी त्यांच्याशी संवाद साधला व आपली भूमिका व्यक्त केली. मराठा आरक्षणाबाबत माझी भूमिका सहकार्याची असल्याचे त्यांनी पटवून दिले आणि २४ गावच्या पाणी प्रश्नाचा मुद्दा धरत संपूर्ण मंगळवेढा तालुका पिंजून काढला. आपली उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच मतदारांना आपलंसं करण्यात त्यांना यश लाभलं. याच प्रकारे प्रचाराचा दौरा त्यांनी पंढरपूर शहर आणि तालुक्यातही राबवला. ही धुरा राबवत असताना भाजप विरोधात असणाऱ्या संघटना, कार्यकर्ते यांनाही आपलंसं करून त्यांना हाताशी धरून विविध ठिकाणी मतदारांशी संवाद साधत सोलापूर लोकसभा मतदारसंघात गेल्या दहा वर्षांमध्ये विकास झाला नाही. या मतदारसंघांमध्ये सर्वांगीण विकास करण्यासाठी व आपल्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी मला संसदमध्ये पाठवा अशी भूमिका मांडून त्यांनी मतदारांच्या मनांत विश्वास निर्माण केला. अनेक ठिकाणी बचत गटाच्या महिलांच्या माध्यमातून त्यांनी संवाद साधला मतदारांपर्यंत पोहोचण्यात कोठेही कसर कमी ठेवली नाही याचाच फायदा त्यांना मताच्या रूपाने मिळाला आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघांमध्ये गेल्या दोन टर्ममध्ये भाजपचे उमेदवार निवडून आले होते. अशातच प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणून भाजपकडून राम सातपुते यांना उमेदवारी दिल्यानंतर भाजपला तिसऱ्यांदा मतदार संघातील मतदार साथ देऊन विजयी करतील असे वाटत होते. कारण या लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा येतात. त्यापैकी पाच विधानसभा आमदार हे भाजपचेच आहेत आणि काँग्रेसच्या उमेदवार या स्वतः आमदार आणि उमेदवार अशी दुहेरी भूमिका बजावत होत्या. उमेदवाराला टक्कर देण्यासाठी त्यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघांमध्ये गेल्या दहा वर्षात खासदार आपल्या भेटीला आले होते काय असा प्रश्न उपस्थित करत या मतदारसंघात कोणताही विकास झाला नाही, विकासात्मक कामे झाली नाही, गेल्या दहा वर्षात महागाई कमी न होता वाढत चालली आहे, सर्वसामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे, प्रत्येक गोष्टीला जीएसटी लावून सर्वसामान्यांचे जगणं मुश्किल केलं आहे, हे सत्ताधारी खोटे बोलतायत, त्याचबरोबर यांची सत्ता आल्यास संविधान बदलले जाणार असल्याचे प्रचारातून मुद्दे उपस्थित केले. याचाही फायदा काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना झाला.



त्यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या विरोधात असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपलंस करण्यात त्यांची गाठभेट घेण्यात आपली भूमिका समजावून सांगण्यात यशस्वी ठरल्या होत्या. मंगळवेढा पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनीही मंगळवेढा तालुका तसेच पंढरपूर तालुक्यात घोंगडी बैठका घेऊन भाजपच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी शर्तीचे प्रयत केले होते. त्याचबरोबर माजी आमदार भाजप नेते प्रशांतराव परिचारक यांनी सुद्धा पंढरपूर तालुक्यासह मंगळवेढा तालुका व या मतदारसंघात ज्या ज्या ठिकाणी आपले कार्यकर्ते संस्था आहेत अशा ठिकाणी भाजपच्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी बैठका घेतल्या आणि यावेळेस भाजपला मतदान करा विधानसभेला काय करायचे ते पाहू असे सांगत मतदारांचे मन वळवण्यात यशस्वी ठरले असल्याचे दिसून येत होते. परंतु पंढरपूर आणि मंगळवेढा मतदारसंघाच्या ग्रामीण भागामध्ये भेडसावणारा पाण्याचा प्रश्न शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही उत्पादन खर्चात वाढ दुधाला दर नाही हे सर्व भावनिक मुद्दे घेऊन काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे या मतदारांपर्यंत पोहोचत होत्या. त्यामुळे या मतदारसंघात उमेदवार कोण हे मतदारांना दिसून आले. तर दुसरीकडे भाजपचे उमेदवार राम सातपुते हे महत्वाच्या ठिकाणी गाठीभेटी घेऊन आपला विजय निश्चित असल्याच्या अविर्भावात असल्याचे मतदारांनाच जाणवू लागल्याने मतदारांनी योग्य निर्णय घेऊन मतदान केल्याचे निकालातून दिसून आले आहे.

भाजपचे उमेदवार राम सातपुते यांना निवडून आणण्यासाठी भाजपचे दमदार प्रचारक यांच्या मतदारसंघात सभा झाल्या. यामध्ये पंढरपुरात नितीन गडकरी यांची सभा झाली होती. या सभेनंतर भाजप उमेदवाराचा विजय निश्चित मानला जाऊ लागला होता दरम्यान काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांची सभा झाली होती. या सभेत काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी प्रतिस्पर्ध्यावर घणाघात करत आपली भूमिका मांडली होती त्याचा परिणाम आजच्या निकालातून दिसून आला.

काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी वेळ साधत पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात फिरत असताना भूतपूर्व आमदार स्व. भारत नाना भालके यांचा मतदारांच्या मनांवर असलेला प्रभाव पाहून त्यांचे चिरंजीव विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भारत भालके, पत्नी प्रणिताताई भगीरथ भालके यांना सोबत घेत मंगळवेढा पंढरपूर मतदार संघात त्यांच्या प्रभावामुळे मतदारांचा पाठिंबा मिळवला आणि प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून आले होते. प्रणिती शिंदे यांना विजयासाठी याचा मोठा फायदा झाल्याचे आजच्या निकालावरून दिसून आले.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये भाजपचे उमेदवार राम सातपुते हे मतदारांपर्यंत पोहोचून त्यांना आपली भूमिका सांगण्यात कमी पडल्याचे निकालावरून दिसून येते कारण पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये ज्या ज्या ठिकाणी ते सभेसाठी प्रचारासाठी आले होते त्या त्या ठिकाणी मतदारांशी संवाद थोडक्यात साधून पुढील ठिकाणी जाण्याची त्यांची गडबड त्यांना भोवल्याचे निकालावरून दिसून आले असे जाणकारातून बोलले जाऊ लागले आहे.

# सदैव जनसेवेच्या आखाड्यातला पैलवानच धाराशिवमध्ये जिंकला

✔ बार्शी/सचिन अपसिंगकर

**बाशी तालुक्यात महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांना मिळालेली ५५००० मताची आघाडी ही त्यांनी या तालुक्यात गेल्या पाच वर्षात दिलेल्या योगदानाची पोच पावती आहे. राज्यातील विजयी उमेदवारांमध्ये निबाळकर यांना मिळालेले मताधिक्य हे लक्षणीय आणि विक्रमी आहे. निंबाळकर यांनी पाच वर्षात बार्शी तालुक्याच्या सार्वजनिक जीवनातील प्रत्ये क समाज घटकाची आपुलकीने घेतलेली दखल हि त्यांना या तालुक्यात लोकप्रियतेच्या कळसावर नेवून गेली.**

निंबाळकर हे गत निवडणूकित सुमारे सव्वा लाखापेक्षा अधिक मतांनी विजयी झाले होते. त्यावेळेला ते भाजपा, शिवसेना या एकसंध युतीचे उमेदवार होते. त्यावेळेला त्यांना बाशी तालुक्यात फक्त एक हजार मतांची आघाडी मिळाली होती. त्यावेळेस त्यांची पाठराखण ही विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांनी ते शिवसेनेत असल्यामुळे केली होती. कालांतराने राजकोय समीकरणे बदलली आणि शिवसेना फुटली. २०१९ साली सोपल शिवसेनेत गेले. ते ठाकरे यांच्या गटातच राहिले. तसेच निंबाळकर यांनी सुध्दा आपली ठाकरेवरची निष्ठा सोडली नाही त्यामुळे गेल्या निवडणूकोत विरोधकाची भूमिका बजावणारे माजी मंत्री दिलीप सोपल या निवडणूकीत ठाकरे गटाच्या माध्यमातून निंबाळकर यांच्याबरोबर राहिले. निवडणूक जाहीर झाल्यानंतर निंबाळकर यांची उमेदवारी ही अघोषित मात्र निश्चित होती. त्यामुळे निंबाळकर यांनी बार्शी तालुक्यात आपला गेल्या पाच वर्षात निमर्ण केलेला जनसंपर्क आणि संघटन यांचे पुनरूज्जीवन केले. निंबाळकर यांनी सोपल यांच्या मदतीने तालुक्यात महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांची मोट बांधली. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते विश्वास बारबोले व त्यांचे पुत्र कृष्णराज बारबोले तसेच काँग्रेसचे ॲड.जीवनदत्त आरगडे व विजय साळूंखे यांनाबरोबर घेवुन प्रचाराची रणनिती आखली. निंबाळकर यांनी भाजपा सरकारची केंद्र व राज्यातील धोरणे तसेच शेतकऱ्यांचा प्रश्न आरक्षणाचा मुद्दा याबाबत जबरदस्त टिका केली. मात्र बार्शी तालुक्यात आमदार राऊत यांच्या नेतृत्वावर टीका करणे टाळले. याचे कारण निंबाळकर यांना पक्के माहित होते को आपली लोकप्रियता ही राऊत गटातील कार्यकर्त्यांमध्ये व समर्थकांमध्ये आणि जनतेमध्ये सुध्दा आहे. त्यामुळे त्यांनी आमदार राऊत यांच्या समर्थकांचा अजिबात वाईटपणा घेतला नाही. याउलट आमदार राऊत यांनी ही राष्ट्रीय निवडणूक असली आणि राज्य व केंद्र सरकारची कामगिरी त्यांनी मांडली. मात्र निंबाळकर यांच्यावर त्यांनी सातत्याने टिका केली. त्यामुळे त्यांचा उलटा परिणाम झाला.

निंबाळकरांचा जनाधार वाटतच गेला. आमदार राऊत यांनी आपल्या भाषणात सरतेशेवटी कांदा, सोयाबीन, आरक्षण या पेक्षा देशप्रेम महत्वाचे असे म्हणत मतदारांना आवाहन करण्याचा प्रयत केला.

तसेच तालुक्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या मराठा समाजाच्या अत्यांत जिव्हाळ्याच्या आरक्षण प्रश्नावर राज्यसरकारने घेतलेली भुमिका या समाजाला पसंत नाही. बार्शी तालुक्यात मराठा सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी आरक्षणाचा प्रश्न हा सतत ज्वलंत ठेवला आहे. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नावर देखील राज्य सरकारवर असलेला राग मतदारांनी या निवडणूकोत पाटील यांच्यावर काढला.

डॉ.पद्मसिंह पाटील, त्यांचे पुत्र राणा जगजितसिंह पाटील यांचे बार्शी तालुक्यात जुणे क्रृणानुबंध आहेत. मात्र पाटील घराण्याने गेल्या पाच वर्षात बार्शी तालुक्यातील कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात हजेरी लावली नाही. त्याचप्रमाणे आपल्या परिचींतांशीही कोणताही संपर्क ठेवला नाही. त्यामुळे अर्चना पाटील यांच्याबद्दल बार्शी तालुक्यातील मतदारांमध्ये कोणतीही आपले पणाची भावना निर्माण झाली नाही. आणि याचाच फटका त्यांच्या उमेदवारीला बसला. बार्शी तालुक्यात निंबाळकर यांना मिळालेल्या मतांच्या आघाडीचे आगामी विधानसभा निवडणुकीबरही पडसाद व परिणाम होणार आहेत.



# अक्कलकोट : भाजपला आत्मचिंतन करायला लावणारा निकाल

## काँग्रेसवाल्यांमध्ये आली 'ऊर्जा'; विधानसभेवर उमटू शकतात पडसाद

✔ अक्कलकोट/रविकांत धनशेट्टी

**सोलापूर लोकसभेच्या निकालाने अक्कलकोट तालुक्यात काँग्रेसवाल्यांमध्ये नवचैतन्य आले आहे. तर याच निकालाने भाजपवर आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. लोकसभेच्या या निकालाचे पडसाद आगामी विधानसभेच्या निवडणुकीवर उमटू शकतात.**

दरम्यान, सोलापूर लोकसभा मतदार संघात काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांचा विजय झाला. अक्कलकोट विधानसभा मतदार संघात भाजपाने ५० हजार पेक्षा लीड घेणार असल्याचे सांगितले होते. तब्बल पाच भाजपाच्या आमदार असलेल्या सोलापूर लोकसभा मतदारसंघात एकहाती लढत देत आमदार प्रणिती शिंदेनी नियोजनबद्ध प्रचार करत विजश्री खेचुन आणली. भाजपाचा उमेदवारही जाहिर झाला नव्हता त्यापुर्वीही प्रणिती शिंदे यांनी अक्कलकोट मतदार संघात प्रचाराला सुरूवात केली होती.

माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, अक्कलकोट शहराध्यक्ष रईस टिनवाला, युवा नेत्याा शीतल म्हेत्रे, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, यांच्या मदतीने अक्कलकोट विधानसभा मतदार संघ पिंजुन काढला. माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांची ग्रामीण भागातील पकड व प्रणिति शिंदे यांचे नियोजनाच्या जोरावर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे ४७४२९ हजाराची लीड तोडत ती लीड फक्त दहा ते अकरा हजार मतापर्यंत आणुन काँग्रेसने निर्विवाद वर्चस्व मिळविले. या मतदार संघातुन भाजपाने गेल्या निवडणुकीसारखे तब्बल पन्नास हजार पेक्षा लीडची अपेक्षा ठेवली होती.पण भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी सर्व नवीन जुन्या भाजपाचे पदाधिकारी यांना एकत्र करण्यात कमी पडले व अतिआत्मविश्विसामुळे व संपुर्ण सोलापूर लोकसभा मतदार संघ सांभाळावे लागल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना तालुक्यात म्हणावा तेवढा वेळ देता आला नाही. परिणामी तालुक्यातील लीड कमी झाली.

लोकसभेची जरी निवडणूक असली तरी आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी मंत्री सिध्दाराम म्हेट्रे यांची विधानसभेची रंगीत तालीम होती.

> तालुक्यातील भाजपाच्या आमदार यांच्या खुनशी, हुकुमशाही राजकारणामुळे तालुक्यातुन लीड कमी झाले. तालुक्याच्या विकासाबद्दल विधानसभेत न बोलता कार्यकर्त्यांच्या हॉटेलबद्दल बोलतात त्याामुळे जनतेने त्याांना नाकारले.
>
> **-शंकर म्हेत्रे, तालुकाध्यक्ष**

> ये तो ट्रेलर है पीजर अभी बाकी है. अति आनंद झाला. सर्व कार्यकर्ते नेते मंडळी यांनी अपार कष्ट घेतले. शेतकरी, युवक महागाई जनतेने मतपेटीतुन उत्तर दिले. तालुक्यातुन एवढे लीड घेऊ, तेवढे घेऊ या त्याांच्या वल्गनाच ठरल्या आहेत. विधानसभेला यापेक्षा चांगले चित्र दिसेल. विरोधकांनी आत्मचिंतन करावे. सरकारी यंत्रणाचा दुरूपयोग लोकांना रूचले नाही. सत्ता येते जाते. सत्ता गर्व व रूबाब दाखविण्यासाठी नाही तर जनतेच्या सेवेसाठी असते हे विरोधकांनी लक्षात घ्यावे.
>
> **-सिद्धाराम म्हेत्रे, माजी मंत्री**



**अक्कलकोट : प्रणिती शिंदे या खासदार पदी निवडून आल्याबद्दल जल्लोष करताना माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्यासह माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, रईस टिनवाला, बाबासाहेब पाटील व आदी.**

### काही लक्षवेधी....

- भारतीय जनता पार्टीला लीड का कमी झाला?
- मुस्लिम मतदार स्वयंफुर्तीने मतदान केंद्रावर रांगा लावून केले होते मतदान
- बसस्थानक शेजारील न्यायालयीन प्रकरण भोवले
- सोलापूर सिद्धेश्वर चिमणी पाडकामामुळे लिंगायत मतदार दुरावले
- प्रणितींचे द्विस्तरीय मायक्रो नियोजन
- युवकांचा वाढता प्रतिसाद
- नवमतदारांना पत्र पाठवून आवाहन
- भाजपचे पदाधिकारी व जुने जाणते नेते यांना प्रचारात समावेश करून न घेतल्याने नाराजी
- एमआयएम व वंचितच्या उमेदवारांने उमेदवारी मागे घेतल्याचा फायदा
- कांदा निर्यात बंदी, महागाईमुळे सामान्य मतदार दुरावला
- सुरत, चेन्नई ग्रीनफिल्ड शेतकरी यांची नाराजी
- संविधान विरोधी भूमिकामुळे दलित मतदार भाजपापासून दुरावला
- मराठा समाज, धनगर समाजच्या नाराजीचाही परिणाम

> सोलापूर लोकसभा मतदारसंघातील जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी असतील किंवा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील त्याांच्या माध्यमातून महायुतीने जिल्ह्याचा विकास मोठ्या प्रमाणात केला पण दुर्दैवाने विकासाच्या मुद्द्यावर लोकांनी विचार का केला नाही याचा विचार करू. निवडणुका या विकासाच्या मुद्द्यावर व्हाव्यात असे मला वाटते पण यामधील ज्या उणीव आहेत त्याा उणिवा आम्ही निश्चितच दूर करू आणि या पुढच्या निवडणुकीमध्ये पुन्हा नव्या जोमाने काम करून यश मिळवू.
>
> **-जिल्हाध्यक्ष भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी**

# काँग्रेसचा सर्वत्र जल्लोष तर भाजप कार्यालयामध्ये शुकशुकाट

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर लोकसभा निवडणुकीची धामधुम चालू असतानाच सोलापुरातील काँग्रेस भवनासह खासदार प्रणिती शिंदे यांच्या जनवात्सल्य ठिकाणी जल्लोष करण्यात आला. मित्र पक्षांच्या कार्यालासमोर दुपारी एक वाजल्यापासून जल्लोष दिसून येत होता. सकाळपासून असलेली भाजप कार्यालयातील गर्दी हळूहळू कमी होत गेली. रामवाडी गोदाम परिसरात एकंदरीत छावणीचे स्वरूप आले होते. असल्यास भर उन्हामध्ये देखील नागरिक मतदानाच्या फिर्या लावून स्वीकारून ऐकत होते.

आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या जयघोष करत गुलालाची मुक्त उधळण करत असल्याचे दिसून आले. काँग्रेस भवनमध्ये दुपारी एक नंतर निकालाचा ओढ वाढू लागल्यानंतर ग्रामीण भागातुन नागरिक व कार्यकर्ते काँग्रेस भवन कडे वाटचाल करत होते. दुपारी चारच्या सुमारास पूर्णपणे निकालाचा कल संस्थेनंतर माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, उज्वलाताई शिंदे, आमदार प्रणिती शिंदे यांनी जनवासल्य या निवास असणारा येऊन जल्लोष केला. त्यानंतर आमदार प्रणिती शिंदे या रामवाडी गोदाकडे जाऊन तेथील विजयाची घोषणा झाल्यानंतर प्रमाणपत्र स्वीकारले.



**सोलापूर : प्रणिती शिंदे या खासदार पदावर निवडून आल्यानंतर काँग्रेस समर्थकांनी त्यांच्या जनवात्सल्य या निवासस्थानी असा जल्लोष केला.**

### भर पावसात जल्लोष

काँग्रेसचे उमेदवार प्रणिती शिंदे निवडून आल्यानंतर कार्यकर्त्यांनी भर पावसामध्ये जल्लोष साजरा केला. यामध्ये आमदार प्रणिती शिंदे यादेखील उपस्थित राहून जल्लोष साजरा केला.

### आमदार निवास व पक्ष कार्यालयासमोर बंदोबस्त

मंगळवारी दिवसभर शहरातील आमदार प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख व आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थान समोर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.